जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
क्र. सा.प्र./कार्या/सेतु कक्ष/125/2018

## -ः संक्षिप्त जाहिरात ः-

महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र.मातंस-1716/प्र.क्र.517/39, दिनांक 19 जानेवारी, 2018 मधील निर्देशान्वये अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर महानगरपालिका - 15, नगरपरिषद, नगरपंचायत - 9, व ग्रामपंचायत क्षेत्रात - 427, अशा एकूण 451 रिक्त असणा-या "आपले सरकार सेवा केंद्र" म्हणून सेवा देण्याकरिता इच्छुक उमेदवारांचे अर्ज संकेतस्थळावर दर्शविलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहे.

इच्छुक अर्जदारांनी दिनांक 09/04/2018 ते 18/04/2018 या कालावधीत या कार्यालयाचे संकेतस्थळ www.ahmednagar.nic.in वरुन विहित अर्ज डाऊनलोड करुन आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयास कार्यालयीन वेळेत दिनांक 18/04/2018 रोजी सायं. 5.30 वाजेपावेतो सादर करावा. त्यानंतर प्राप्त अर्जाचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागनिहाय रिक्त असलेल्या केंद्राबाबतची माहिती, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रात रिक्त असलेल्या केंद्राची माहिती, तसेच तालुका निहाय ग्रामपंचायत क्षेत्रातील रिक्त असलेल्या केंद्राबाबतची माहिती या कार्यालयाचे संकेतस्थळ www.ahmednagar.nic.in वर प्रसिध्द केलेली आहे. सदर यादीत प्रसिध्द केलेल्या रिक्त केंद्रांकरिताच अर्ज सादर करावेत.

आपले सरकार सेवा केंद्रा बाबत पात्र/अपात्र उमेदवार यांचेबाबत सर्व माहिती www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल त्या करीता कार्यालयाशी संपर्क साधण्याची आवश्यकता नाही.

**ठिकाण ः- अहमदनगर**
**दिनांक ः- 05/04/2018**

**उपजिल्हाधिकारी महसूल**
**तथा सदस्य सचिव, जिल्हा सेतु समिती,**
**अहमदनगर**